| | |
|---|---|
| **Headline:** NSE's contribution to life of Katkari Tribes of Satara | |
| **Source:** Punya Nagari | **Date:** 31 October 2017 |

# साताऱ्यात कातकरी आदिवासींच्या जीवनात एनएसईचे योगदान

**सातारा** / प्रतिनिधी

भारताचा आघाडीचा भांडवली बाजार अर्थात नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. (एनएसई)ने साताऱ्यातील कातकरी आदिवासी जनसमूहाच्या जीवनांत सकारात्मक बदलासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आपल्या अभिनव सामाजिक दायित्व उपक्रमांच्या (सीएसआर) माध्यमातून एनएसई येथील दारिद्ररेषेखालील कातकरी आदिवासींच्या अभावग्रस्त मुलांसाठी शैक्षणिक प्रकल्प राबवत आहे. एनएसईसमर्थित या प्रकल्पाची अंमलबजावणी सातारा जिल्ह्यातील आठ आदिवासी पाडे आणि आठ ग्रामीण क्षेत्रांमध्ये अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्थेद्वारे केली जात आहे.

एनएसईने या आदिवासी मुलांना साक्षरता आणि संख्यात्मक प्रावीण्यासाठी चांगले शिक्षण प्राप्त करण्यास मदत केली आहे. शिवाय त्यांना क्रीडा, सार्वजनिक संभाषण, नृत्य आणि नाट्यकला इत्यादींशी संबंधित इतर कौशल्य विकसित करण्यास प्रोत्साहनदेखील दिले जात आहे. तिरंदाजी आणि ॲथलेटिक अशी त्यांच्या पारंपरिक कौशल्य ओळखून आणि विविध स्पर्धांसाठी मुला-मुलींचा सराव आणि सहभागाद्वारे प्रोत्साहन दिले गेले आहेसाताऱ्यात एनएसई राबवित असलेल्या उपक्रमांना गमतीजमतींसह शिक्षण या संकल्पनेतून 'शिक्षण रंजन केंद्र (एसआरके) ' आणि 'शिक्षण मित्र' यांचे सहकार्य लाभले आहे. त्यातून वंचित घटकांतील मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व सर्वांगीण विकासाची काळजी घेतली गेली आहे. या उपक्रमांमध्ये पथनाट्य, कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, चित्रकथा (चित्रांच्या सहाय्याने कथाकथन) यांच्या मदतीने तसेच जनजागरण यात्रांच्या माध्यमातून अध्ययन आणि क्रियाकलापांवर आधारीत शिक्षणाची विशेष पद्धत अनुसरली गेली आहे. आणि सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात 'शिक्षण रंजन केंद्रा'द्वारे एनएसईच्या सीएसआर संघाद्वारे दिला जात आहे. या उपक्रमाचे लाभ अफाट आणि दृश्यमानही आहेत. कारण या अगोदर आदिवासी मुलांचे प्रमाणात शाळेत प्रवेश घेण्याचे प्रमाण कमी आणि त्यांच्या गळतीचा दरही खूप जास्त होता. सरलेल्या सप्ताहाअखेरीला एका खेड्यात कातकरी समाजातील मुले एकत्रित आले आणि शाळांमध्ये नावनोंदणी करण्यास आणि एनएसईच्या 'शिक्षण रंजन केंद्रां'मध्ये उपस्थितीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.